ISSN: 2454-5503
IMPACT FACTOR: 4.197(IIJIF)
(UGC Approved Journal No. 63716)

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

VOL. 4 NO. 2 Feb. 2018
A BIMONTHLY REFEREED INTERNATIONAL JOURNAL

## SPECIAL ISSUE ON
## POLITICS OF FARMERS LOAN WAIVER SCHEME IN MAHARASHTRA

9th February, 2018



*Guest Editor*
**Dr. Raju Vanarse**

*Principal*
**Dr. Ashok Naikwade**

DEPARTMENT OF POLITICAL SCIENCE
Ajintha Education Society's
SANT DNYANESHWAR MAHAVIDYALAYA
SOEGAON, DIST. AURANGABAD(MS).

ISSN : 2454-5503

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES (CHCS)

**A BIMONTHLY REFEREED INTERNATIONA JOURNAL**

VOL. 4 No. 2 Feb. 2018

(UGC Approved Journal No. 63716)

Impact Factor: 4.197 (IIJIF)

**SPECIAL ISSUE ON**

"POLITICS OF FARMERS LOAN WAIVER SCHEME IN MAHARASHTRA"

**9th February 2018**

*Organized by*

DEPARTMENT OF POLITICAL SCIENCE

Ajintha Education Society's

SANT DNYANESHWAR MAHAVIDHYALAYA,

SOEGAON, DIST. AURANGABAD (MS)

*Principal*

Dr. Ashok Naikwade

SANT DNYANESHWAR MAHAVIDHYALAYA, SOEGAON,

DIST. AURANGABAD (MS)

*Guest Editor*

Dr. Raju Vanarse

*Guest Co-Editor*

Mr. Shrikrushna Parihar

MGEW SOCIETY'S

CENTRE FOR HUMANITIES AND CULLTURAL STUDIES

KALYAN (MAHARASHTRA)

Contact : +919730721393 +91 8329000732 chcskalyan@gmail.com

**Full Journal Title:** Chronicle of Humanities & Cultural Studies(CHCS)
**Print ISSN:** 2454-5503
**UGC Approved Journal No.** 63716
**Impact Factor** 3.012 (IIJIF)
**Frequency:** Bimonthly / **Language:** Multi Language / **Journal Country/Territory:** India
**Publisher:** Centre for Humanities & cultural Studies, A-102, Sanghavi Regency, Sahyadrinagar, Kalyan (W) (MS).
**Subject Categories:** Humanities & Cultural Studies

*Chief Editor*

**Dr Kalyan Gangarde**
Director, Centre for Humanities and Cultural Studies, Kalyan (W)

*Executive Editor*

**Dr Grishma Khobragade,** Asst. Prof., Birla College, Kalyan (W)

*Co- editors*

**Dr. Sadhana Agrawal,** Asst. Professor, Maharani Laxmibai Govt. College of Excellence, Gwalior (M.P.) India
**Pandurang Barkale,** Asst. Professor, Dept of English, SNDT Women's University, Churchgate, Mumbai
**Bharat Gugane,** Asst. Professor, Bhosala Military College, Nashik, Maharashtra
**Dashrath Kamble,** Asst. Professor, S.B.College, Shahapur, Dist. Thane, Maharashtra
**Sachin Bhumbe,** Asst. Professor, P. N. Doshi College, Ghatkopar, Mumbai

## EDITORIAL ADVISORY BOARD

**Aju Mukhopadhyay,**
a poet, author and critic, 8 Cheir Lodh Street, Pondicherry, India.
Email: ajum24@gmail.com
**Dr R.T. Bedre,**
Principal RSPMS' SPP College, Sirsala, Dist. Beed (MS)
**Dr (Mrs.) Smita R. Nagori,**
Head,PG Department of English, M.U.College Udgir, Dist. Latur, Maharashtra, India. Email: smita.lakhotiya@gmail.com
**Dr Arvind Nawale**
Head, Department of English, Shivaji Mahavidyalaya Udgir, Dist. Latur (Member, BoS in English, Former Member of the Senate, Faculty of Arts, SRTM University, Nanded amnawale@gmail.com
**Dr Kailash Nimbalkar,**
Principal, S.B.College, Shahapur, Dist. Thane, Maharashtra, India. Email: nimbalkar_8@rediffmail.com.
**Tsai-ching Yeh**
Assistant professor, Department of English, National Taipei University of Technology. (Taivan)
**Dr B. N. Gaikwad,**
Vice Principal, N.G. Acharya and D.K. Marathe College of Arts, Commerce and Science , Chembur (East), Mumbai-400071
**Dr Simon Philip,**
Assistant professor, Department of Social Work, Voorhees College, Vellore
**Dr Binu Anitha Josheph**
Assistant professor, Department of English, Voorhees College, Vellore
**Dr Chandrashekhar Kanase**
Head, Department of Dramatics, SPP College, Sirsala, Dist Beed (MS)

## EDITORIAL BOARD

**Dr.Mahendra Shinde,** Associate Professor and Head, Department of English, N.M. Sailu, Dist. Parbhani, Maharashtra, India.
**Ram Bhise,** Assistant Professor, Saraswati College of Engineering, Kharghar, Navi Mumbai Maharashtra,India.
**Dr Asish Gupta,** Asst. Professor, J. H. Govt. P. G. College, Betul MP.

| **Subscription Rates** | | |
|---|---|---|
| | Annual membership (Individual) | Rs. 1,800 (150 $ for foreigners) ( Six Issues ) |
| | Bi-annual Membership | Rs. 3,500 (250 $ for foreigners) |
| | Institutional annual membership | Rs. 2,200 |
| | Institutional Bi-annual membership | Rs. 4,200 |

*Those interested in making online transactions. the following details may be of use:*

| Bank Name | Account Name | Account Number | IFSC code |
|---|---|---|---|
| Canara Bank<br>**(Branch: New Marine Lines, Mumbai)** | Centre for Humanities & Cultural Studies | 1389101071921 | CNRB0001389 |

*DISCLAIMER: Academic facts, views and opinions published by authors in the Journal express solely the opinions of the respective authors. Authors are responsible for their content, citation of sources and the accuracy of their references and biographies/references. The editorial board or Editor in chief cannot be held responsible for any lacks or possible violations of third parties' rights.*

ISSN:2454-5503
Impact Factor : 4.197 (IIJIF)


| | | |
|---|---|---|
| 74 | शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचे राजकारण<br>* प्रा. उज्वला कळात्रे ** प्रा. डॉ. भा. ना. गाडेकर | 170 |
| 75 | शेतकरी आत्महत्या – अर्थव्यवस्थेसमोरील एक आव्हान<br>प्रा. विजय भुजंगराव मांटे | 172 |
| 76 | महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या आणि शेतकरी कर्जमाफी योजना यांचा अन्वयार्थ<br>डॉ. प्रशांत एन. देशमुख | 175 |
| 77 | शेतकऱ्यांच्या आत्महत्या : समस्या व उपाय<br>प्रा. गौतम कांबळे | 179 |
| 78 | ग्रामीण भागातील कर्जाची आवश्यकता आणि वस्तुस्थिती<br>प्रा. आजिनाथ नानाराव जिवरग | 181 |
| 79 | मराठवाड्यातील गटशेतीची वाटचाल व सद्यस्थिती<br>* डॉ. शिवाजी अंभोरे ** श्री. गोवर्धन एल. भुतेकर | 183 |
| 80 | शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी कृषी पर्यटन एक सक्षम पर्याय<br>डॉ. भोरे छत्रगुण उध्दव | 186 |
| 81 | सरकारचे धोरण आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या<br>गायकवाड जे. जी. | 188 |
| 82 | विषवृक्षाच्या मुळया - सहकारातील योजनांची छळगाथा<br>डॉ. कैलास इंगळे | 189 |
| 83 | शेतकरी कर्जमाफीचे राजकारण<br>डॉ. डी.एस. बिरुटे | 191 |
| 84 | किसानों की आत्महत्या : एक ज्वलंत समस्या<br>प्रा. डॉ. शंकर गंगाधर शिवशेट्टे | 193 |
| 85 | तकनीकी सुविधा और कृषि विस्तार<br>डॉ. बिरंगणे एस. एस. | 196 |
| 86 | जल संधारन ओर संवर्धन<br>डॉ. संतोष तांदळे | 198 |
| 87 | किसान आत्महत्याएँ और कृषि संकट<br>डॉ. बालाजी जोकरे | 200 |

ISSN:2454-5503
Impact Factor : 4.197 (IIJIF)

# CONTENTS


| Sr. No. | Title / Author | Page No. |
|---|---|---|
| 1 | Debilitating Effects of Crop Loan Waiver Policies in India<br>Babasaheb Mundhe | 1 |
| 2 | A GEOGRAPHICAL ANALYSIS OF LITERACY IN NANDURBAR DISTRICT (MAHARASHTRA STATE)<br>* Prof. Dr. S. M. Lawande ** Mr. Vijay. R. Baviskar | 5 |
| 3 | An Analysis of Economical Conditions of Migrated Sugarcane Harvesters from Beed Taluka<br>Shivaji Madhavrao More | 9 |
| 4 | World's Best Technology to Transform Indian Agriculture<br>Dr. H. T. Kurkute | 14 |
| 5 | TO STUDY THE CROPPING PATTERN AND MANAGEMENT OF ONION CROP IN CHANDWAD & NIPHAD TAHSIL OF NASHIK DISTRICT (M.S.)<br>* Mr. Somnath Arote ** Prof. Dr. S.M. Lawande *** Mr. G. J. Nikam | 16 |
| 6 | Farmers Suicide in India : Causes and Solutions<br>Dr. Vandana M. Mahure | 19 |
| 7 | Farmers' Suicides in India, 1995-2012<br>Mr. Lahane Keshav Ambadas | 22 |
| 8 | ROLE OF CO-OPERATIVE SUGAR FACTORIES IN MARATHWADA REGION FOR NATION DEVELOPMENT<br>Mr. Sunil S. Choudhare | 25 |
| 9 | Land Rights is the Basis for Sustainable Livelihood of Indian Tribal Women<br>* Dr. Sonkamble C. P. ** Dr. Fulchand Salampure | 28 |
| 10 | Implementation of Swaminathan Commission<br>Dr. Wanne Mohan B. | 30 |
| 11 | Causes and Effect of Climate Change<br>* Prakash Konka ** Kartik Nagrajan | 32 |
| 12 | Study of Irrigation Facility of Nashik District<br>* Madhuri L. Gavit ** Rajendra D. Khurche | 35 |
| 13 | Agro Entrepreneurship an Emerging Entrepreneurial Sector<br>Dr.Vikas Choudhari | 37 |
| 14 | An overview of water storage for farming in India state<br>* Manojkumar U. Chopade ** Vinod K. Barote | 39 |
| 15 | Farmers' Welfare Schemes<br>Asst. Prof M. N. Navse | 42 |
| 16 | Farmer's Suicide and Role of Farmer's Movement; with Special Reference to Maharashtra<br>Mr. Nikam Rajaram Digambar | 44 |
| 17 | SOCIO-ECONOMIC AND POLITICAL IMPLICATIONS OF FARMERS' SUICIDES<br>Praful Sahebrao Deore | 45 |
| 18 | Farmers' Suicides in Maharashtra : Content Analysis of Media Reports<br>Dr. Namanand G. Sathe | 47 |
| 19 | शेतकरी आत्महत्या - एक निरीक्षण<br>* प्रा.डॉ. बळीराम डी. कटारे ** डॉ. श्याम एस. देशमुख | 51 |
| 20 | **शेतकरी आत्महत्या आणि राजकारण**<br>* प्रा. डॉ. रमाकांत तिडके ** प्रा. स्वप्निल बोधने | 53 |
| 21 | शेतकऱ्यांच्या आत्महत्या : भारतीय लोकशाहीतील एक विदारक वास्तव<br>प्रा.एकनाथ खरात | 55 |
| 22 | शेतकरी आत्महत्या : वास्तव व उपाय<br>प्रा.डॉ.संजय वामनराव भोळे | 58 |
| 23 | कृषी क्षेत्राचा शाश्वत विकास : नवीन पर्याय शोधण्याची गरज<br>* डॉ. आर. बी. वनारसे ** डॉ. सत्यपाल हरिभाऊ कांबळे | 60 |
| 24 | शेतकऱ्यांच्या आत्महत्या व मराठवाडा - एक अभ्यास<br>डॉ. दिनकर संतुकराव कळंबे | 62 |

| | | |
|---|---|---|
| 25 | शेतकऱ्यांची निर्भरता : कृषी विकासाचे राजकारण<br>डॉ. आर. बी. शेगुळ | 64 |
| 26 | छत्रपती शिवाजी महाराज कृषी सन्मान योजना : समाजशास्त्रीय अभ्यास<br>प्रा. मांगडे गोपाळ मदन | 66 |
| 27 | विकसनशील महाराष्ट्रातील युवा संस्कृती : एक आव्हान<br>डॉ. नंदकिशोर बाबासाहेब भगते | 68 |
| 28 | शेतकरी आत्महत्या : शासन -प्रशासनाची भूमिका : विशेष संदर्भ मराठवाडा<br>डॉ. आरगडे अंबादास रोहिदास | 70 |
| 29 | शेतकऱ्यांच्या आत्महत्या : मानसशास्त्रीय विश्लेषण व उपाययोजना<br>डॉ. एम. जी. शिंदे | 74 |
| 30 | पोशिंदा शेतकऱ्यांच्या आत्महत्या : मानवतेचा बळी<br>प्रा.डॉ. दिनेश रा. हंगे | 76 |
| 31 | शेतकरी संप : व्यवस्था परिवर्तनाची नवी नांदी<br>डॉ. गणेश मोहिते | 78 |
| 32 | भारतातील शेतकरी आत्महत्या : कारणे आणि उपाय<br>प्रा.डॉ. विश्वनाथ गोविंदराव कंभारे | 80 |
| 33 | शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी शासनाच्या उपाययोजना<br>एक चिकित्सक अभ्यास<br>खेडाळकर पद्मा अशोकराव | 82 |
| 34 | महाराष्ट्र शासन अंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेचा<br>एक चिकित्सक अभ्यास<br>मिसाळ कल्पना भास्कर | 84 |
| 35 | महाराष्ट्र शासनाच्या कृषी धोरणातील योजनाचा अभ्यास<br>चव्हाण अनिता सुकलाल | 86 |
| 36 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर : जलधोरण व व्यवस्थापनातील योगदान<br>एक चिकित्सक अभ्यास<br>तोडकर सोमेश्वर परमेश्वर | 88 |
| 37 | भारतातील कृषी पध्दतीतील आधुनिक तंत्राचा भौगोलीक अभ्यास<br>प्रा. एल. झेड. पाटील | 90 |
| 38 | भारतीय शेती आणि अन्न प्रकिया उद्योग<br>प्रा.हर्षवर्धन दामोदर जाधव | 91 |
| 39 | महाराष्ट्रातील शेतकरी चळवळीमध्ये शेतकरी संघटनेचे योगदान<br>चौधरी प्रदिप विनायक | 93 |
| 40 | भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीची भूमिका<br>श्री. जयद्रथ सौदागर माने | 96 |
| 41 | उदगीर शहरातील वडार जमातीतील स्त्रियांचे स्वयंसहाय्यता गटामुळे<br>झालेले सबलीकरण : एक अभ्यास<br>अलका रानबा जामकर | 98 |
| 42 | भारतीय हस्तउद्योगाचा ऱ्हास व त्याचे परिणाम<br>प्रा. जामकर ए. आर. | 100 |
| 43 | शेतकरी आत्महत्या : स्वामीनाथ आयोगाच्या शिफारशी<br>डॉ. सुनिल पिंपळे | 102 |
| 44 | छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना : विशेष संदर्भ - पैठण तालुका<br>डॉ.रामेश्वर कल्याणराव वाघचौरे | 104 |
| 45 | शेतकऱ्यांच्या आत्महत्या व स्वामीनाथन आयोग<br>डॉ. अतुल खोसे | 105 |
| 46 | शेतकऱ्यांची आत्महत्या : एक समाजशास्त्रीय विश्लेषण<br>डॉ. मधुकर चाटसे | 108 |
| 47 | २१ व्या शतकात महाराष्ट्रातील शेतीपुढील समस्या<br>दिपक बाबुलाल शिरसाट | 110 |
| 48 | शेतकऱ्यांची आत्महत्या<br>मनिषा तुकाराम खंडाळे | 112 |

ISSN:2454-5503
Impact Factor : 4.197 (IIJIF)


| | | |
|---|---|---|
| 49 | मराठवाडा व शेतकरी आत्महत्या<br>* प्रा. श्रीकृष्ण परिहार ** डॉ. विनोद बारोटे *** प्रा. संतोष पडघन | 114 |
| 50 | शेतकरी आत्महत्या प्रमाण थांबविण्यासाठी शिक्षण हा उपयुक्त पर्याय<br>डॉ. नासीर तालीप गिरासे | 117 |
| 51 | शेतकऱ्यांसाठी व्हाट्सअॅप या सोशल मीडियाद्वारे शेतीला आत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या माहितीचे संप्रेषण<br>डॉ. दादासाहेब राधाजी पवार | 119 |
| 52 | शेतकरी आत्महत्या : कारणे व उपायांचे समाजशास्त्रीय अध्ययन<br>* प्रा. डॉ. कांबळे बी.एम ** प्रा.भाऊसाहेब दादाराव साबळे | 121 |
| 53 | भारतीय अर्थव्यवस्था आणि कृषी<br>डॉ. संतोष भिवसन काकडे | 123 |
| 54 | शेतकरी आत्महत्या : औरंगाबाद जिल्हाचा विशेष अभ्यास<br>प्रा.डॉ.समाधान एस. आमले | 125 |
| 55 | वाटचाल... जलसाक्षरतेच्या दिशेने<br>डॉ. पंडित शेषराव नलावडे | 128 |
| 56 | हवामान बदलाचा शेतीवरील प्रभाव व शेतकरी आत्महत्या : विशेष संदर्भ महाराष्ट्र राज्य<br>डॉ. पंकज युवराज शिंदे | 130 |
| 57 | कृषी क्षेत्रातील अरिष्टांचे स्वरूप : कारणे व उपाययोजना<br>* प्रा. डॉ. संभाजी वारूंगळे पाटील ** प्रा. डॉ. रामदास बाबाजी निहाळ | 133 |
| 58 | महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्या - एक भयानक वास्तव<br>डॉ. दीपक भुसारे | 137 |
| 59 | शेतकरी आत्महत्या : एक वास्तव<br>कावेरी शंकरराव गाडेकर | 139 |
| 60 | भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी आणि पाण्याची भूमिका<br>प्रा. डॉ. जे. टी. कांबळे | 141 |
| 61 | शेतकरी कर्जमाफी - राजकारण आणि वास्तव : एक दृष्टिक्षेप<br>प्रा. कल्याण आश्रु वरळे | 143 |
| 62 | शेतकरी आत्महत्या आणि महाराष्ट्र<br>प्रा.डॉ. अर्जुन उबाळे | 145 |
| 63 | कर्जमाफीच्या पलीकडे विचार करा<br>आबासाहेब बब्रुवान गायकवाड | 148 |
| 64 | महाराष्ट्रातील गतकालीन शेतीचे आजच्या काळातील बदलते स्वरूप<br>श्रीमती निता शेषराव सपकाळ | 150 |
| 65 | भारतातील शेतकरी आत्महत्या : समस्या व शासनाची भुमीका<br>डॉ. रामकिशन वसंतराव लोमटे | 152 |
| 66 | कृषी क्षेत्राचा विकास : शासनाचे धोरण आणि राजकारण<br>* प्रा. डॉ. व्ही. एन. ढाले ** प्रा. डॉ. डी. जे. घेरमूने | 154 |
| 67 | शेतकरी आत्महत्या : कारणे व उपाय<br>खंडेराव हरिभाऊ काळे | 156 |
| 68 | शेती क्षेत्रामध्ये हरितक्रांतीचे योगदान<br>डॉ. वसंत आर पवार | 158 |
| 69 | स्वामीनाथन आयोग : शेतकऱ्याच्या आत्महत्या आणि उपाय<br>* डॉ. डी.आर. भागवत ** प्रा. वाघमारे एन.एस. | 160 |
| 70 | ग्रामीण विकासात शासकीय योजनांचे योगदान<br>डॉ. किरण काळे | 162 |
| 71 | भारतातील कृषीक्षेत्रामध्ये अन्नप्रक्रीयाची भुमीका आणि महत्त्व<br>भोजने दिपाली भास्कर | 163 |
| 72 | शेतकऱ्यांची कर्जमाफी : खरी गरज नकारात्मकता सोडण्याची<br>डॉ. भारत गोरे | 166 |
| 73 | शेतकऱ्यांच्या आत्महत्येची कारणे आणि कर्जमाफी<br>डॉ. निलेश गोकुळ शेरे | 168 |

ISSN:2454-5503
Impact Factor : 4.197 (IIJIF)

# ग्रामीण भागातील कर्जाची आवश्यकता आणि वस्तुस्थिती

प्रा. आजिनाथ नानाराव जिवरग
अ.र.भा.गरुड कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, शेंदुर्णी
ता. जामनेर, जि.जळगांव

भारत हा कृषी प्रधान देश आहे. आणि ६८% लोकसंख्या ही कृषी क्षेत्रावर आपला उदरनिर्वाह करते. पाच लाख खेड्यांच्या या देशात स्वातंत्र्यपूर्व कृषी हा अर्थव्यवस्थेचा कणा मानला गेला होता. शेती हा मुख्य व्यवसाय म्हणून ओळखला जात होता. एकुण रोजगारापैकी आजही ५०% लोकसंख्या शेती क्षेत्रात गुंतलेली आहे. त्यामुळे शेती क्षेत्रातील उत्पन्न व गुंतवणूक लक्षात घेणे महत्वाचे ठरते. भारतीय शेती १००% मान्सूनवर अवलंबून आहे. दुष्काळ, अतिवृष्टी इ.सारख्या कारणामुळे भारतीय शेतीला मान्सूनचा जुगार असे म्हणतात. या अवस्थेमुळेच शेतकरी वर्षानुवर्षे कर्जाच्या ओझ्याखाली दबला गेल्याचे दिसते. याचा परीणाम शेतकरी आत्महत्या प्रमाणात झालेली वाढ होय. म्हणूनच ग्रामीण भागातील कर्ज व्यवस्था व वितरण व्यवस्था अभ्यासणे गरजेचे दिसून येते. ग्रामीण भागातील सामाजिक व आर्थिक क्रिया शेतीने साथ न दिल्याने कर्जाशिवाय पार पाडणे अशक्य होते. आणि म्हणूनच शेतकरी कर्जाचा सहारा घेतांना दिसून येतो.ग्रामीण भागात विविध माध्यमातून - शासकीय निमशासकीय व खाजगी प्रकारच्या कर्ज वितरण व्यवस्था वापर होतो. शासकिय व निमशासकिय कर्ज वितरण व्यवस्था ही सावकारी कर्जाच्या पाशातून मुक्त करण्यासाठी प्रयत्नशील असते. या सर्वांचा आढावा घेणे महत्वाचे ठरते.

**ग्रामीण भागातील कर्ज व्यवस्था व आवश्यकता :**

१) **दिर्घ मुदतीचे कर्ज :** अशाप्रकारच्या कर्जाची आवश्यकता सर्वसामान्यपणे पाच वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी असते. प्रामुख्याने शेती अवजारे, ट्रॅक्टर्स, विहिरी खोदणे, जमीन खरेदी करणे, इ. कामासाठी लागते. हे कर्ज शासकिय स्तरावर घेणे शेतकऱ्यांना परवडणारे असते.

२) **मध्यम मुदतीचे कर्ज :** जास्तीत जास्त पाच वर्षापर्यंत कालावधी असलेल्या या कर्जाची आवश्यता जनावर खरेदी करणे, लहान लहान कृषी उपकरण खरेदी करणे, शेळीपालन, कुकूटपालन, पाईप लाईन करणे, बगीचा घेणे, फळ उत्पादन घेणे इ. साठी असते.

३) **अल्पमुदतीचे कर्ज :** सर्वसामान्यपणे वार्षिक स्वरुपाच्या कर्जात खत बियाणे खरेदी करणे, रोजगाराची रोजंदारी देणे,इ. कामे केली केली जातात.

वरील तीनही प्रकारचे कर्ज शेतकरी प्रामुख्याने आपले कृषी उत्पादन वाढविण्यासाठी घेत असतो.व या कर्जाचा वापर शेती कार्यात केल्यास मुळ मुद्दल व व्याज भरणे अवघड जात नाही. परंतू कर्जाचा उपयोग शेती उपयोगी कामा व्यतिरिक्त केल्यास उदा. लग्नकार्य , कोर्ट कचेरी ,इ. केल्यास शेतकऱ्याच्या उत्पादन क्षमतेत वाढ होत नाही. परिणामी अशासकिय कर्जाची मदत घेणे शेतकऱ्यांना भाग पडते.

**ग्रामीण भागातील कर्ज उपलब्धता.**

१) **सहकारी बँका :** शासकीय स्तरावर जिल्हा सहकारी बँकेच्या माध्यमातून कर्ज वितरण केले जाते. शेतकऱ्यांना सावकारापासून कर्जमुक्ती हा मुख्य उद्देश सहकारी बँकेच्या स्थापनेचा आहे. हे कर्ज अल्प कालीन व दिर्घ कालीन असते. १९९३ ला भारतामध्ये ग्रामीण भागासाठी शासकिय अर्थसाह्ययातुन ५०८० करोड रु. सहकारी बँकेच्या माध्यमातून कर्ज म्हणून उपलब्ध करुन दिले गेले. १९९४ ला हे कर्ज ६६०० करोड रु. वाढवून दिले गेले. याप्रकारच्या कर्ज वितरणामध्ये भारतात महाराष्ट्र, गुजरात, आंध्र प्रदेश, आसाम, राजस्थान हे राज्य अग्रेसर दिसून येतात.

२) **भूविकास बँक :** ग्रामीण भागात कर्ज उपलब्ध करुन देण्यासाठी शासकिय स्तरावर भूविकास बँकांची स्थापना केली गेली. या बँका कर्ज देतांना शेतकऱ्यांच्या जमीनी ठेव म्हणून ठेवू शकत होत्या तसेच हे कर्ज विहीरी खोदणे, पाईप लाईन करणे, ट्रॅक्टर्स खरेदी करणे इ. कामासाठी मिळत असे. या प्रकारच्या बँकांची स्थापना केंद्रस्थर, राज्यस्थर, जिल्हास्तरावर झाली. परंतू भारताच्या एकुण क्षेत्रापैकी केवळ तामिळनाडू , कर्नाटक आणि आंध्रप्रदेश या तीन राज्यात ७० % भूविकास बँका स्थापन करण्यात आल्याने इ. राज्यांना या बँकांच्या कर्जाचा फायदा फारसा घेता आला नाही.

३) **को-ऑपरेटिव्ह बँक :** सुरुवातीला व्यापारी बँका ह्या शेती क्षेत्रात योगदान देत नसत परंतू १९६९ ला १४ बँकांचे व १९८० ला ६ बँका राष्ट्रियकृत झाल्याने को-ऑपरेटिव्ह बँकांनी शेती क्षेत्रात योगदान देण्यास सुरुवात केली.

४) **ग्रामीण बँक :** ग्रामीण भागातील लहान शेतकरी किंवा भूमिहीन शेतकरी यांना लघुउद्योगासाठी कर्ज देण्यासाठी व शेती क्षेत्राचा विकास घडवून आणण्यासाठी ग्रामीण बँक स्थापना करण्याचा प्रस्ताव १९७२ करण्यात आला.व तो पुर्ण करण्यासाठी ३ वर्षे कालावधी लागला. १९७५ ला ४ राज्यामध्ये ५ ग्रामीण बँकाची स्थापना केली गेली या बँकानी वितरीत केलेल्या एकुण कर्जा पैकी ९०% कर्ज अल्पभूधारक भूमिहिन शेतकरी यांच्यासाठी केले.

५) **नाबार्ड बँक :** भारतात १२ जुलै १९८२ नॅशनल बँक फॉर ॲग्रीकल्चर ॲण्ड रुरल डेव्हलपमेंट (नाबार्ड) स्थापना केली . लघुउद्योग , कुटीर उद्योग इ. माध्यमातून ग्रामीण विकास घडवून आणण्यासाठी नाबार्ड कर्ज देण्याचे काम करते.

६) **किसान क्रेडीट कार्ड :** भारतामध्ये शेतकऱ्यांना अल्पकाळासाठी कर्ज उपलब्ध करुन देण्यासाठी १९९८ किसान क्रेडीट कार्ड योजना सुरु केली. नंतरच्या कालखंडात या योजनेचे रुपांतर कृषी विमा योजनेत झाले.

किसान क्रेडिट कार्डची २०११-१२ ची स्थिती

| क्रमांक | संस्था | किसान क्रेडिट कार्डाची संख्या | टक्केवारी | स्विकृत रक्कम (करोड मध्ये) |
|---|---|---|---|---|
| ०१ | सहकारी संस्था | २९,५९,०४३ | ३०% | १०६४२.५२ |
| ०२ | ग्रामीण बँक | १९,९५,५६५ | २०% | ११५१६.२० |
| ०३ | सार्वजनिक क्षेत्रातील बँका | ५१,१८,५४९ | ५०% | ५००८७.५३ |
| | एकुण | १००,७३,१५७ | १००% | ७२२४६.२५ |

*. गैरसरकारी कर्ज वितरण व्यवस्था

ISSN:2454-5503
Impact Factor : 4.197 (IIJIF)

१. सावकारी कर्ज : ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था मान्सूनच्या लहरी पणामुळे कमकुवत झालेली असून शासकिय स्तरावर मिळणाऱ्या मदती अल्पस्वरुपाच्या व वेळेवर उपलब्ध न झाल्याने तसेच शेतकऱ्यांची निरक्षरता, बँक कर्मचाऱ्यांचे असहकार्य व कागदपत्र अपुर्तता इ.मध्ये गुंतलेली कर्ज व्यवस्था शेतकऱ्यापर्यंत पोहचत नाही परिणामी ग्रामीण भागात सावकारी कर्ज हा पर्याय स्वातंत्र पुर्व काळापासून आजपर्यंत शेतकरी निवडताना दिसतात. या प्रकारच्या कर्जासाठी विशिष्ट कागद पत्रांची गरज नसते. कमीत कमी वेळेत हे कर्ज उपलब्ध होते. भारतामध्ये परवाना धारक सावकार संख्या कमी असून ते देखील ग्रामीण भागात शेतकऱ्यांची लुट करताना दिसतात. अखिल भारतीय ग्रामीण कर्ज सर्वेक्षण १९५४ नुसार ग्रामीण भागात एकुण कर्जापैकी ७०% कर्ज वाटप हे खाजगी सावकाराच्या माध्यमातुन झाल्याचे दिसते. बँकांच्या स्थापनांमुळे ग्रामीण भागात कर्ज वितरण व्यवस्था उपलब्ध झाल्याने १९९१ ला हे कर्जाचे **प्रमाण** ७०%वरुन १८% वर आले.

२. व्यापारी : ग्रामीण भागात खाजगी स्वरुपात व गुप्तपणे अनेक व्यापारी कर्ज देण्याचे काम करतात. प्रामुख्याने शेतकऱ्यांना कृषी बियाणे व खत विक्रेता, पेढीवाले व्यापारी, अशा छुप्या कर्जाचे वितरण करतात.

३. नातेवाईक व मित्र परिवार : ग्रामीण भागात बरेच शेतकरी अल्पमुदतीचे कर्ज म्हणून मित्र किंवा नातेवाईकाकडून पैसे कर्जाऊ म्हणून घेतात. परंतू बऱ्याच वेळा वेळेवर कर्ज वापसी न झाल्याने संबंधामध्ये वितुष्ट निर्माण होते. व विविध गुन्हेगारी सारख्या घटना घडल्याची उदाहरणे आपणासमोर आहेत.

**निष्कर्ष :**

ग्रामीण भारतात स्वातंत्र काळापुर्वी खाजगी स्वरुपाच्या कर्जाचे प्रमाण अधिक होते. परंतू स्वातंत्र्यानंतर विविध बँकाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा शासकिय स्तरावर उपलब्ध करण्याचा प्रयत्न झाला त्यामुळे सावकारी कर्जापासून शेतकऱ्यांची काही अंशी मुक्तता झाली. ग्रामीण भागात शेती विकास कार्यक्रम हाती घेवून पीक कर्ज, फळबाग कर्ज, विविध कृषीयंत्र खरेदी कर्ज, सिंचन सुविधा खरेदी कर्ज , दिर्घ व अल्प मुदतीव्दारे उपलब्ध करुन देण्याच्या प्रयत्नात वाढ झालेली दिसून येते.

**संदर्भ :**

१. भारत मे ग्रामीण साखर व्यवस्था वर्तमान प्रवर्तीया - डॉ. अर्चना शर्मा - कुरुक्षेत्र डिसें- २०१३
२. ग्रामीण क्षेत्रों मे ऋणप्रबंधण - डॉ.अर्जुन सोलंकी- कुरुक्षेत्र डिसें- २०१३
३. मासिक साप्ताहीक - ०५ जुन २०१६
४. ग्रामीण समाज व विकास - डॉ. संभाजी देसाई - प्रशांत प्रकाशन
५. किसान साप्ताहीक -१४ मे २०१४
६. भारतापुढील आव्हाने आणि सद्यस्थिती - डॉ. पंडीत नलावडे
७. हवामानशास्त्र - डॉ. जयकुमार मगर -

◆◆◆